पुढारी

# ‘फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड’, मुकुल माधव फाउंडेशनची विद्यार्थिनीला मदत

पुणे : रत्नागिरी जिल्ह्यातील पावसमधील नळेवाथेर गावातील तनुजा दत्ताराम मोर्ये ही बुद्धिमान मुलगीही त्यातीलच एक. तिचे आई-वडील रोजंदारीवर उपजीविका करणारे मजूर आहेत. तनुजा पावसच्या स्वामी स्वरूपानंद विद्यामंदिरातून १०० टक्के गुण मिळवून एसएससीची परीक्षा उत्तीर्ण झाली. तिला उच्चशिक्षणासाठी पैशांची आवश्यकता होती. भारतातील सर्वांत मोठी पीव्हीसी पाइप्स आणि फिटिंग्ज तयार करणारी कंपनी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि त्याचे सीएसआर पार्टनर मुकुल माधव फाउंडेशन (एमएमएफ) तिचे उद्दिष्ट साध्य करण्यात तिला मदत करण्यासाठी पुढे आले. तिची कनिष्ठ महाविद्यालयाची फी, निवास-भोजनाचा खर्च आणि शैक्षणिक कारणांसाठी तिला लागणारा अन्य खर्च असे सर्व खर्च उचलण्याचा निर्णय या दोहोंनी घेतला. कंपनीने १,१७,५०० रुपयांची देणगी तनुजा दत्ताराम मोर्ये हिला दिली.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि त्यांचे सीएसआर पार्टनर मुकुल माधव फाउंडेशन (एमएमएफ) एकत्रितपणे आरोग्यसेवा, शिक्षण, समाजकल्याण आणि जलसंवर्धनाच्या



क्षेत्रात सक्रियपणे काम करत आहेत. एमएमएफ लोकांपर्यंत जाऊन वंचितांना त्यांच्या प्रवासात पाठबळ देत आहे. शिक्षणाच्या माध्यमातून महत्त्वाकांक्षा पूर्ण करू पाहणा-या मुलांकडे आर्थिक पाठबळ नसेल तर ते देण्याचे काम मुकुल माधव फाउंडेशनने केले आहे.

यासंदर्भात मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाबरिया म्हणाल्या, शिक्षण, आरोग्यसेवा आणि पाणी या आयुष्यातील मूलभूत गरजा आहेत आणि प्रत्येक व्यक्तीला या गरजा पूर्ण करण्याचा समान अधिकार आहे. हा अधिकार त्यांना मिळावा म्हणून लोकांपर्यंत पोहोचण्याचा आणि त्यांना मदत करण्याचा प्रयत्न आम्ही मुकुल माधव फाउंडेशनमधून करतो. शिक्षण हा आमच्या कामाचा महत्त्वपूर्ण स्तंभ झाला आहे.